नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १७२ | Issue - 172 | वार शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०२४ | Blow- Saturday Date 9 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात पारा घसरला, कडाक्याची थंडी पडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे उत्तर महाराष्ट्रात किमान तापमान १५ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. शुक्रवारी (८ नोव्हेंबर) नाशिकमध्ये राज्यात सर्वांत कमी १४.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. उत्तर महाराष्ट्रात पुढील पाच दिवस थंडी कायम राहण्याचा अंदाज आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून थंड वारे राज्यात येत आहेत. त्यामुळे प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रात आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत किमान तापमानात घट झाली आहे. शुक्रवारी नाशिकमध्ये राज्यात सर्वांत कमी १४.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. नगरमध्ये १५.७, जळगावात १५.७, महाबळेश्वरमध्ये १५.२ आणि पुण्यात १६.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. उत्तरेकडील वाऱ्याचा प्रवाह पुढील पाच दिवस कायम राहण्याचा अंदाज असल्यामुळे प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रात पुढील पाच - सहा दिवस थंडी राहण्याचा अंदाज आहे. राज्याच्या अन्य भागात थंडी वाढली आहे. मराठवाड्यात १६.५ ते १८ अंश सेल्सिअस, विदर्भात १७.५ ते १९.५ अंश सेल्सिअस आणि किनारपट्टीवर १९.६ ते २५ अंश सेल्सिअस दरम्यान किमान तापमान होते. शुक्रवारी कुलाब्यात २५.२ तर सांताक्रुजमध्ये २२.० अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे.

दरम्यान, पुढील आठवडाभर राज्यात कुठेही पावसाची शक्यता नाही. ढगाळ हवामान निर्माण होण्याची शक्यता नाही, त्यामुळे तापमान स्थिर राहण्याचा अंदाज आहे.

राज्यभरात किमान तापमानात घट झालेली आहे, तशीच कमाल तापमानातही घट झाली आहे. किनारपट्टीवर ३४ ते ३५ अंश सेल्सिअस, मराठवाड्यात ३० ते ३२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्रात ३१ ते ३४ अंश सेल्सिअस आणि विदर्भात ३१ ते ३३ अंश सेल्सिअस दरम्यान कमाल तापमान होते. मुंबईत कमाल तापमानात फार घट झाली नसली तरीही हवेतील आर्द्रता कमी झाल्यामुळे मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे.


# भुजबळांच्या दाव्यावरून राजकीय वर्तुळात खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ईडीपासून मुक्तीसाठी भाजपबरोबर गेल्याच्या छगन भुजबळ यांच्या दाव्यावरून केंद्रीय यंत्रणांचा सत्ताधारी भाजपकडून दुरुपयोग केला जात असल्याच्या आरोपाला पुष्टीच मिळाल्याचा दावा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला. असे काही वक्तव्य केल्याचा इन्कार करीत भुजबळांनी विकासाच्या मुद्द्यावर आम्ही भाजपबरोबर गेल्याचा दावा केला.

ईडीपासून मुक्तीसाठी भाजपबरोबर गेल्याचा भुजबळांच्या दाव्याबाबत 'लोकसत्ता'मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताचे राजकीय वर्तुळात पडसाद उमटले. भुजबळांच्या विधानाचा हवाला घेत विरोधकांनी भाजपवर केंद्रीय यंत्रणांचा दुरुपयोग केला जात असल्याचा आरोप केला. अजित पवार यांनाही भुजबळांचे समर्थन करावे लागले. निवडणुकीच्या तोंडावर चुकीचे कथानक रचले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

विरोधी नेत्यांच्या विरोधाती ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग अशा केंद्रीय यंत्रणांचा दुरुपयोग केला जात असल्याचा आरोप




आम्ही आधीपासून करीत होतो. भुजबळांच्या दाव्याने या आरोपाला पुष्टीच मिळाल्याचे राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. भुजबळांचे वक्तव्य १०० टक्के खरे आहे. विरोधी नेत्यांवर दबाव वाढविण्यासाठी केंद्रीय यंत्रणांचा दुरुपयोग केला जात असल्याचे राष्ट्रवादीचे नेते माजी मंत्री अनिल देशमुख यांनी सांगितले.

छगन भुजबळ यांनी मात्र आपण अशी कोणतीही मुलाखत दिली नसल्याचे स्पष्ट केले. ईडीपासून मुक्तीसाठी नव्हे तर विकासाच्या मुद्द्यावर आम्ही भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेतला होता, असे भुजबळ म्हणाले. ही भूमिका अजित पवार यांनी तेव्हाच मांडल्याकडे लक्ष वेधले.

# गाडीला ना चाक, ना ब्रेक, चालकाच्या सीटसाठीही रस्सीखेच सुरू; नरेंद्र मोदींची महाविकास आघाडीवर टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धुळे : महाविकास आघाडीच्या गाडीला ना चाक आहेत ना ब्रेक आहे. चालकाच्या सीटसाठीही तिन्ही पक्षात रस्सीखेच सुरू आहे. आम्ही जनतेला ईश्वरांचं रुप मानतो. जनतेची सेवा करण्यासाठी राजकारणात आलो आहे. मात्र, महाविकास आघाडीतील नेते जनतेला लुटण्यासाठी राजकारणात आले आहेत, अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी केली आहे. पंतप्रधान मोदी यांनी धुळ्यातून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केली. यावेळी बोलताना त्यांनी काँग्रेससह महाविकास आघाडीला लक्ष केलं. पंतप्रधान मोदी म्हणाले, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी प्रत्येक योजनेत भ्रष्टाचार केला. राज्यातील जनतेने त्यांचं अडीच वर्षांचे शासन बघितलं आहे. आधी त्यांनी सरकार लुटले, नंतर जनतेला लुटलं. त्यांनी मेट्रो प्रकल्प बंद केले, वाढवण बंदराचं काम थांबवण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. तसेच समृद्धी महामार्गाला विरोध केला, अशा नेत्यांपासून आता महाराष्ट्रातील जनतेने सावध होण्याची गरज आहे. महायुती सरकारच्या केंद्रस्थानी महिला आहेत. कारण महिलांचा विकासा झाला, तरच समाजाचा विकास होता. त्यामुळे आम्ही महिलांना केंद्रस्थानी ठेऊन अनेक योजना सुरू केल्या आहेत. महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही लाडकी बहीण



सारख्या अनेक योजना सुरु केल्या आहेत. लाडकी बहीण योनजेची चर्चा केवळ महाराष्ट्रातच नाही देशभरात सुरु आहे. मात्र, काँग्रेस आणि महाविकास आघाडी नेते ही योजना बंद करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यासाठी त्यांचे काही लोक न्यायालयातही जाऊन आले. त्यांना महिलांचा झालेला विकास पचणी पडत नाही, अशी टीकाही पंतप्रधान मोदी यांनी केली. पुढे बोलताना, गेल्या अडीच वर्षात महायुती सरकारने विकासकामांचा नवा उच्चांक गाठला आहे. एकनाथ शिंदे यांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्राला गौरव पुन्हा मिळाला आहे. भाजपा महायुती आहे, तर गती आहे आणि तरच महाराष्ट्राची प्रगती आहे, आम्ही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आम्ही पूर्ण केली. दुसरीकडे काँग्रेसने राज्यात आणि केंद्रात सत्ता असताना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या मागणीकडे दुर्लक्ष केलं.

# सरन्यायाधीश चंद्रचूड निवृत्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड शुक्रवारी निवृत्त झाले. आपल्या कामकाजाच्या अखेरच्या दिवशी केलेल्या निरोपाच्या भाषणात चंद्रचूड भावनिक झाले. त्यांचा कार्यकाळ १० नोव्हेंबर रोजी संपणार आहे.



मात्र ९ आणि १० नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाला सुट्टी असल्याने आज त्यांच्या कामकाजाचा शेवटाच दिवस ठरला. आता न्यायाधीश संजीव खन्ना हे देशाचे नवे सरन्यायाधीश असतील. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी त्यांच्या कार्यकाळाच्या अखेरच्या दिवशी अलीगढ मुस्लिम विद्यापाठाच्या अल्पसंख्यांक दर्जा संदर्भातील महत्त्वाचा निर्णय दिला. त्यांच्या अध्यक्षतेखालील ७ सदस्यांच्या खंडपीठाने ४-३ अशा बहुमताने चणच्या अल्पसंख्यक दर्जा कायम ठेवला. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या लास्ट वर्किंग डेचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ज्यात ते थोडेसे झुकून हात जोडून सर्वांना नमस्कार करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आज त्यांना निरोप दिला. या वेळी अभिषेक मनू सिंघवी आणि कपिल सिब्बल यांच्यासह अनेक वकिलांनी ऑनलाइन स्ट्रीमिंग द्वारे चंद्रचूड यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे आभार मानले. आपल्या निरोपाच्या भाषणात बोलताना सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले, उद्यापासून मी न्यायदानाचे काम करू शकणार नाही.पण मी समाधानी आहे.

# केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे निर्देश; वाढत्या इन्फ्लूएन्झापासून बचावासाठी 'एसएच २४' लस घ्या!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हिवाळ्यामध्ये इन्फ्लूएंझाच्या रुग्ण संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने नागरिकांना 'सदर्न हेमीस्फिअर कॉड्रीवॅलेंट २०२४' (एसएच२४) ही लस देण्याचे निर्देश दिले आहेत. ही लस चार प्रकारच्या इन्फ्लूएंझापासून संरक्षण करत असल्याने या लशीचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले



असले तरी ही लस उपलब्ध नसल्यास सध्या उपलब्ध असलेली उत्तम लस नागरिकांना देण्यात यावी, असेही केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

भारतात ऑगस्टपर्यंत १५ हजार जणांना इन्फ्लूएंझाची लागण झाली असून, यातील २३९ जणांचा मृत्यू झाला आहे. हिवाळ्यामध्ये यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असते. साधारणपणे इन्फ्लूएंझाचा सर्वाधिक त्रास हा ६५ वर्षे व त्यावरील नागरिकांना होतो. वृद्ध आणि आजारी लोकांच्या संपर्कात सातत्याने येणाऱ्या व्यक्ती, गर्भवती महिला, लहान मुले तसेच आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ही लस घेणे आवश्यक आहे.

इन्फ्लूएंझा हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा प्रसार वेगाने होतो. हिवाळ्यामध्ये इन्फ्लूएंझासाठी पोषक वातावरण असल्याने त्याचा प्रसार अधिक होतो. त्यामुळे त्याला आळा घालण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) ही लस घेण्याची शिफारस केली आहे. फेब्रुवारीपासून भारत, युरोप, पश्चिम आशिया, दक्षिण आफ्रिका, ब्राझीलमध्ये एच१एन१ इन्फ्लूएंझा विषाणू वाढत असल्याचे डब्ल्यूएचओने स्पष्ट केले आहे.

इन्फ्लूएंझा हा संसर्गजन्य आजार असल्याने उत्तर गोलार्धातील नागरिकांना फेब्रुवारीमध्ये आणि दक्षिण गोलार्धातील नागरिकांना सप्टेंबरमध्ये लस देण्यात यावी, असेही डब्ल्यूएचओकडून सांगण्यात आले आहे. भारतामध्ये या लशीची किंमत नियंत्रित नसल्याने प्रति डोस १८०० ते २००० रुपये नागरिकांना मोजावे लागतात.

# महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर वाहनांची कडक तपासणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील वागदरी- हिरोळी या मुख्य मार्गावर दोन्ही राज्यांचे अधिकारी रात्रंदिवस वाहनांची कडक तपासणी करत आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या कर्मचारी भाग्यवंती मंदिरासमोरील तात्पुरत्या शेडमध्ये कर्नाटकातून महाराष्ट्र राज्यात येणाऱ्या लॉरी, टमॅटम, टेम्पो, जीप, कार यासह सर्व खासगी वाहनांची तपासणी करून त्यांची क्रमांक दाखल केली जात आहे. संशयास्पद वाहनांची तपासणी करून त्याचे चित्रीकरण केले जात आहे. एक ग्रामसेवक, दोन पोलीस हवालदार, पाच उत्पादन शुल्क अधिकारी, एक पोलिस निरीक्षक, एक एएसआय, एक कॅमेरामन असे नऊ जणांचे पथक दोन शिफ्टमध्ये वाहनांची तपासणी करत आहे.

हा मुख्य रस्ता असल्याने तपासणीसाठी थोडा वेळ लागत असल्याने वाहने रांगेत उभी राहत असल्याने थोडीफार गर्दी होत आहे. याबाबत ग्रामसेवक राजेंद्र कणमुसे यांनी माहिती दिली, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार वाहनातून येणारी अवैध दारू, ५० हजारांहून अधिक रोकड, कागदोपत्री नसलेले मौल्यवान वस्तू व अवैध शस्त्रास्त्रे यांची अधिक तपासणी करण्यात येत असून जनतेचे सहकार्य लाभत आहे. ते म्हणाले की, वरिष्ठ अधिकारी वेळोवेळी या ठिकाणी भेट देऊन पाहणी करीत आहे .

कर्मचारीसाठी तात्पुरते शेड बांधण्यात आले असून एक छोटा मंडप बांधण्यात आला आहे. झाडाच्या सावलीत बसून वाहनांना बॅरिकेडद्वारे थांबवून वाहनांची तपासणी करून त्यांचे अनुक्रमांक नोंदवले जातात.

ग्रामसेवक राजेंद्र कळमुसे,रतनसिंग चव्हाण, उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक शुभम अस्वार, एएसआय सुरेश चव्हाण, समर्थ हरणे, योगेश पाटील, सचिन भोसले, अक्षय उदागडे, समाधान राऊता, कॅमेरामन संदीप बिराजदार हे शुक्रवारी कर्तव्यावर होते.

कर्नाटक सीमेवर महाराष्ट्रातून कर्नाटकात येणाऱ्या सर्व खासगी वाहनांची कर्नाटक सीमेवर तपासणी करणे बंधनकारक आहे. अवैध दारू, ५० हजारांहून अधिकची विना दस्तऐवज रोख, अवैध शस्त्रे, मौल्यवान वस्तू तपासण्यात येत आहेत. मा.हिप्परगा पोलीस स्टेशनचे फक्त दोन पोलीस कर्मचारी कार्यरत असून रात्री कोणीही नाही. कर्मचाऱ्यांना काही व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी येथे वाहनांची तपासणी करणे शक्य होत नाही. महाराष्ट येथून कर्नाटकात प्रवेश करणारी वाहने दोन कॉन्स्टेबल अडवून तपासणीच्या बहाण्याने दंड आकारत असल्याची तक्रार वाहनधारकांनी करित आहे. या सीमेवर दोन तात्पुरते शेड असून दिवाबत्तीची व्यवस्था नाही.

**तपासणीच्या नावाखाली कर्नाटकातील कर्मचारी वाहने थांबवून दंड वसूल करत आहेत. दंड वसूल च अधिकार फक्त अधिकाऱ्यांनाच आहे असे असताना दोन पोलीस कर्मचारी वाहन थांबवून तपासणीच्या नावाखाली दंड आकारात आहे. वरिष्ठअधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन तपासणीच्या नावाखाली जनतेवर होणारा पिळवणूक थांबावा.**

**– मोहन नवले, चालक**

## अक्कलकोट विधान सभा प्रचारार्थ रिपाईने घेतली मुसंडी

**सैदप्पा झळकी**

# महायुतीचा उमेदवार कल्याणशेट्टी यांना विजयी करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी) : अक्कलकोट तालुक्याच्या विकासासाठी भाजपा रिपाइं महायुतीच्या उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांना विययी करण्याचे रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनीआव्हाहन केली आहे. निवडणूक जाहीर झाल्या पासून महायुतीमध्ये रिपब्लिकन पार्टि आँफ इंडिया (आठवले गट)या महायुतीचे अक्कलकोट विधानसभा २५० चे उमेदवार आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांना दुसऱ्यांदा संधी मिळविण्यासाठी कसरत करीत आहेत. मागचा निवडणूकीत रिपाईचे तालुकाध्यक्ष व कार्यकर्ते पुर्ण ताक्दीने तालूका पिंजून काढला होता.व सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी भरघोष मताने विजयी मिळवून दिलेला होता. अताचा ही निवडणूकीत महायुतीचे घटक पक्ष असलेले रिपब्लिकन पार्टी आँफ इंडिया आठवले गटाने सुध्दा युती धर्म पाळून प्रचारार्थ अग्रेसर असल्याचे दिसून येते.केंद्रीय मंत्री ना.रामदासजी आठवले साहेब व प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवादे साहेब यांचा आदेशाने तालुकाध्यक्ष अविनाशजी मडिखांबे साहेब यांचा नेतृत्वाखाली व जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांचा मार्गदर्शानानुसार अक्कलकोट तालुक्याचे पदाधिकारी व सर्व शाखाचे रिपाईचे कार्यकर्ते महायुतीचा प्रचारार्थ मोठ्या संख्याने असल्याचे दिसून येतं.





अक्कलकोट तालुक्यातील सलगर जिल्हा परिषद व सिन्नूर पंचायत गणातील सर्व गावात प्रचार सभेत बोलत होते.

यावेळी महायुतीचे उमेदवार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचा सोबत सदैव असणारे रिपाईचे तालुकाध्यक्ष अविनाशजी मडिखांबे, जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,भाजपा ता अध्यक्ष मोतीराम राठोड,दुधनी कृ उ बा समितीचे सभापती अर्पण परमशेट्टी,उपसभापती सिध्दार्थ बाके,महेश पाटील प्रकाश कळसगोंड,शंकर भांजे,बसवराज हौदे,तालूका सरचिटणीस राजू भगळे, आंदेवाडी गावचे सरपंच रमेश धोडमनी, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, निंगप्पा निंबाळ,संतोष जन्ना यांचासह रिपाईचे सिन्नूरचे कार्यकर्ते जयकुमार सोनकांबळे,जगन्नाथ जाधव,खाजप्पा मांग, सिध्दाराम सोनकांबळे, रवि कांबळे, धर्मा मांग, अंबण्णा मांग, शिवानंद सोनकांबळे, गुरूशांत सोनकांबळे, दताप्पा कांबळे, सुनिल सोनकांबळे, हणमंत कांबळे, अनिल कांबळे, आकाश कांबळे,परशुराम मांग, बसनिंगप्पा मांग, संगप्पा मांग, बसप्पा मांग, पिंटु मांग यांचा सह गावातील महायुतीचे कार्यक्रर्ते मोठ्या संख्येने उपास्थित होते.महायुतीचे उमेदवार सचिन दादा कल्याणशेट्टी रिपाईचे तालुकाध्यक्ष अविनाश अण्णा मडिखांबे यांचे गावातील माताभगीनीने आरती ओवळून स्वागत केले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### हवामानात बदल

राज्यभरात किमान तापमानात घट झालेली आहे, तशीच कमाल तापमानातही घट झाली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून थंड वारे राज्यात येत आहेत. त्यामुळे प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रात आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत किमान तापमानात घट झाली आहे. किनारपट्टीवर ३४ ते ३५ अंश सेल्सिअस, मराठवाड्यात ३० ते ३२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्रात ३१ ते ३४ अंश सेल्सिअस आणि विदर्भात ३१ ते ३३ अंश सेल्सिअस दरम्यान कमाल तापमान होते. मुंबईत कमाल तापमानात फार घट झाली नसली तरीही हवेतील आर्द्रता कमी झाल्यामुळे मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान उत्तरेकडील वाऱ्याचा प्रवाह पुढील पाच दिवस कायम राहण्याचा अंदाज असल्यामुळे प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रात पुढील पाच - सहा दिवस थंडी राहण्याचा अंदाज आहे. राज्याच्या अन्य भागात थंडी वाढली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे उत्तर महाराष्ट्रात किमान तापमान १५ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. नाशिकमध्ये राज्यात सर्वांत कमी १४.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. उत्तर महाराष्ट्रात पुढील पाच दिवस थंडी कायम राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान इन्फ्लूएंझा हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा प्रसार वेगाने होतो. हिवाळ्यामध्ये इन्फ्लूएंझासाठी पोषक वातावरण असल्याने त्याचा प्रसार अधिक होतो. त्यामुळे त्याला आळा घालण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) ही लस घेण्याची शिफारस केली आहे. फेब्रुवारीपासून भारत, युरोप, पश्चिम आशिया, दक्षिण आफ्रिका, ब्राझीलमध्ये एच१एन१ इन्फ्लूएंझा विषाणू वाढत असल्याचे डब्ल्यूएचओने स्पष्ट केले आहे. इन्फ्लूएंझा हा संसर्गजन्य आजार असल्याने उत्तर गोलार्धातील नागरिकांना फेब्रुवारीमध्ये आणि दक्षिण गोलार्धातील नागरिकांना सप्टेंबरमध्ये लस देण्यात यावी, असेही डब्ल्यूएचओकडून सांगण्यात आले आहे. हिवाळ्यामध्ये इन्फ्लूएंझाच्या रुग्ण संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने नागरिकांना 'सदर्न हेमीस्फिअर क्वॉड्रीवॅलेंट २०२४' (एसएच२४) ही लस देण्याचे निर्देश दिले आहेत. ही लस चार प्रकारच्या इन्फ्लूएंझापासून संरक्षण करत असल्याने या लशीचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले असले तरी ही लस उपलब्ध नसल्यास सध्या उपलब्ध असलेली उत्तम लस नागरिकांना देण्यात यावी, असेही केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. भारतात ऑगस्टपर्यंत १५ हजार जणांना इन्फ्लूएंझाची लागण झाली असून, यातील २३९ जणांचा मृत्यू झाला आहे. हिवाळ्यामध्ये यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असते. साधारणपणे इन्फ्लूएंझाचा सर्वाधिक त्रास हा ६५ वर्षे व त्यावरील नागरिकांना होतो. वृद्ध आणि आजारी लोकांच्या संपर्कात सातत्याने येणाऱ्या व्यक्ती, गर्भवती महिला, लहान मुले तसेच आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ही लस घेणे आवश्यक आहे.

# महायुतीचे उमेदवार आ.ज्ञानराज चौगुले यांना चौकार मारण्याची संधी द्यावी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## विजयाचा गुलाल उधळायला मी २३ तारखेला नक्की येणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : धाराशिव जिल्ह्यातील उमरगा- लोहारा विधानसभा मतदारसंघातील शुक्रवारी (ता. ८) रोजी उमरगा येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य प्रचारसभेसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांनी उपस्थित राहून जमलेल्या जनसमुदायाला संबोधित केले. या मतदारसंघाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी ज्ञानराज चौगुले यांनाच पुन्हा एकदा मोठ्या मताधिक्याने निवडून देत विधानसभेत पाठवावे असे आवाहन केले. हा मतदारसंघ वर्षानुवर्षे शिवसेना पक्षाचा बालेकिल्ला राहिला असून तो अभेद्य ठेवण्याची जबाबदारी ज्ञानराज चौगुले यांच्या खांद्यावर आहे. काँग्रेसच्या पायाशी गहाण ठेवलेला धनुष्यबाण आपण सोडवून आणला. ज्ञानराज चौगुले यांच्या बद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले उमरगा लोहारा मतदारसंघाच्या विकास कामांसाठी सर्वाधिक स्वाक्षरी घेणारा आमदार, गोगलगाय मुळे झालेल्या नुकसाना बद्दल घेतलेला निर्णय हा ज्ञानराज चौगुले यांच्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात लागू झाला व सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली. सामान्य कुटुंबातला, गरीब घरातला सर्वांबाबत आपुलकी असणारा आमदार म्हणजे ज्ञानराज चौगुले.

आपले सरकार स्थापन झाल्यामुळे या मतदारसंघात ज्ञानराज चौगुले यांनी एक आमदार म्हणून अनेक भक्कम कामे केली त्यामुळे त्यांना निवडून देऊन पुन्हा एकदा या भागाचा सर्वांगीण विकास करण्याची संधी आपल्याला मिळाली असल्याचे मत याप्रसंगी व्यक्त केले.

या मतदारसंघांमध्ये उर्वरित मोठी कामे सिंचन, वीज, रोजगार, महिला सक्षमीकरण, आरोग्य या सर्वांसाठी सर्वतोपरी प्रयत्न करू त्यासाठी ज्ञानराज चौगुले यांना प्रचंड बहुमताने पुन्हा विजयी करावे असे आवाहन केले.

महायुतीच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली आणि महाविकास आघाडीच्या पोटात दुखू लागले. ते आमच्या विरोधात कोर्टात गेले. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने चांगलीच थोबाडीत दिली. लाडक्या बहिणींच्या मुलांच्या तोंडचा घास पळविण्याचे काम महाविकास आघाडी करीत असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला आहे. आमच्या सरकारने आणलेल्या योजनाच त्यांनी ढापल्या आहेत. एकीकडे आम्ही आणलेल्या योजनांना विरोध करायचा, दुसरीकडे आमच्या योजना स्वतःच ढापायच्या, असा हा प्रकार आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या विरोधात हीच मंडळी न्यायालयात गेली होती. आता नाव बदलून ते ही योजना देऊ पहात आहेत. ते फेक नरेटिव्ह पसरवणारे आहेत. आमचे सरकार प्रिंटिंग मिस्टेक वाले नाही, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली.

यावेळी माजी खासदार प्रा.रविंद्र गायकवाड, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, माजी सभापती जितेंद्र शिंदे, भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ.चंद्रकांत महाजन, माजी जि.प. सभापती अभय चालुक्य, युवा सेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड,भाजपा तालुकाध्यक्ष शाहजी पाटील ,भाजपा जिल्हा उद्योग आघाडी अध्यक्ष श्रीकांत मणियार, भाजपाचे दिलीप गौतम, माजी सभापती हरीश डावरे, शेतकरी सेना विलास भगत ,संतोष सगर ,माजी सभापती मदन पाटील,सुभाष सोनकांबळे, सुधाकर महाराज, माधव पवार ,राहुल पाटील, अरुण इगवे,सुशिल दळगडे,दत्ता पाटील, युवराज जाधव, बाळासाहेब किस्से, ड.वैजीनाथ आडसकर, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पनुरे, सिद्रामप्पा चिंचोळे, प्रा.शौकत पटेल, सचिन जाधव, आदी उपस्थित होते. तसेच यावेळी गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर, माजी पंचायत समिती सदस्य उमरगा विष्णू पाटील, उपसरपंच आलूर जितेंद्र पोतदार, विभाग प्रमुख उबाठा महादेव म्हात्रे बलसुर, माजी सरपंच जेकेकुर दत्ता पाटील, आकाश राजे कांबळे,बळीराम मोरे यांनी शिवसेना शिंदे गटामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये प्रवेश केला.

यावेळी उमरगा -लोहारा मतदारसंघातील महायुतीच्या घटक पक्षांचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मतदार संघातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीचे सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करावे : राजाभाऊ सरवदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनीधी : येथील कविराज मंगल कार्यालय येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले सोलापूर जिल्हा कार्यकारिणीची महत्त्व पुर्ण बैठक संपन्न झाली. याप्रसंगी भाजपा+आरपीआय आठवले+राष्ट्रवादी+शिवसेना मित्र पक्षाचे महायुतीचे सोलापूर जिल्ह्यातील सर्व उमेदवार भरगोस मतांनी विजयी करावेत असे प्रतिपादन आरपीआय आठवले प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी सांगोला येथील रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हा बैठकी प्रसंगी बोलताना केले.

यावेळी.महाराष्ट्र राज्य सचिव सुनीलजी सर्वगोड, महाराष्ट्र राज्य संघटक बापूसाहेब जगताप,प.महा.सरचिटणीस जितेंद्र बनसोडे व सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.




यावेळी बैठकीच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले होते. बैठकीचे उपस्थितांचे स्वागत व प्रस्ताविक जिल्हा सरचिटणीस श्यामसुंदर उर्फ रवी गायकवाड यांनी केले.

सांगोला तालुकाध्यक्ष खंडू सातपुते, आक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे, माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, पंढरपूर तालुकाध्यक्ष संतोष पवार, माढा तालुकाध्यक्ष मारुती वाघमारे,उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विठ्ठल वाघमारे, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष रामजी गायकवाड, मंगळवेढा तालुकाध्यक्ष अशोक शिवशरण, सरचिटणीस, कार्याध्यक्ष, युवक तालुकाध्यक्ष उपस्थित होते.

# उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचार फेरीस प्रचंड प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पंढरपूर शहर व औद्योगिक वसातिथून सरगम चौथे प्रचार रॅली काढण्यात आली त्याला मतदारासून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल दादा सावंत यांनी पंढरपूर शहरातून प्रचाराला सुरुवात केल्यामुळे सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

प्रचारात शहरांमधून आघाडी घेत असल्याचे चित्र संपूर्ण पंढरपूर शहरांमध्ये औद्योगिक वसाहती मधील व्यापारी वर्ग व कामगार वर्ग अनिल सावंत यांच्या स्वच्छ प्रतिमा व माळकरी विठोरायांचा भक्त म्हणून या व्यापारी व सर्वसामान्य नागरिक कामगार वर्गात ओळख झाल्यामुळे सर्व मतदारा मला चांगल्या लोकप्रतिनिधी मिळणार या भावनेने त्यांचे स्वागत सर्वत्र केले जात आहे

एक स्वच्छ प्रतिमा व राजकारणातील कोरी पाटी म्हणून त्यांची ओळख ही अनिल



दादा सावंत यांनी विजयी करावा अशी चर्चा त्यांनी या औद्योगिक वसाहत्व कुंभार गल्ली कैकाडी मठ अनिल नगर जुनी पेठ व या परिसरातील नागरिकांनी त्यांचे मोठ्या प्रमाणात स्वागत केले.

वरील भागात प्रचार करीत असता येथील नागरिकांनी महिलांनी या भागात नागरी सुविधा उपलब्ध नाहीत रस्ते नाहीत अशा अडचणी सांगितल्या व या सर्व अडचणी समस्या मी सोडवणार फक्त एकदा मला सेवा करण्याची संधी द्या मी या संधीचे सोने केल्याशिवाय राहणार नाही असे वचन उमेदवार अनिल दादा सावंत यांनी या भागातील मतदारांना दिले.

या प्रचार फेरीत माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले शिवसेना नेते सुधीर अभंगराव, संदीप मांडवे, सुधीर भोसले, विश्वजीत भोसले, व महाविकास आघाडीचे सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या मोठ्या संख्येने उपस्थित होते

## महाविकास आघाडीचे माढ्याचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ उपळाई येथे जाहीर सभा

**जयंत पाटील यांचे प्रतिपादन**

# महाराष्ट्र गुजरातला आंदण देणाऱ्या महायुती सरकारला धडा शिकवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यातील मोठमोठे उद्योगधंदे गुजरातला नेऊन येथील रोजगार पळविला जात असताना बघ्याची भूमिका घेणाऱ्या शिंदे सरकारने महाराष्ट्र राज्य जणू गुजरातलाच आंदण दिले आहे. शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीतही भ्रष्टाचार करून त्याची परिसीमा गाठणाऱ्या त्रिकुटाला पुन्हा सत्तेत बसवणे म्हणजे राज्याला अधोगतिकडे नेण्यासारखे आहे, हे राज्यातील जनतेने ओळखले आहे. सध्या निवडणूक आपल्या टप्प्यात आली असून विजयाचे मताधिक्य वाढवा, असे आवाहन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले.



माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित पाटील यांच्या प्रचारासाठी उपळाई (ता.माढा) येथे आयोजित सभेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, संजय पाटील-घाटणेकर, ड. बाळासाहेब पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, निरीक्षक शेखर माने, प्रशांत पाटील, विलास साठे, संदीप साठे, रवी पाटील, नागेश फाटे, साईनाथ अभंगराव, बापूसाहेब जाधव, विलास देशमुख, दीपक देशमुख, ज्योती कुलकर्णी, सुवर्णा शिवपूजे, पोपट अनपट, रणजित बागल, विजयसिंह पाटील, संजय पाटील, रामकाका मस्के, बाबुतात्या सुर्वे, भारत पाटील, आकाश पाटील, रावसाहेब देशमुख, रविंद्र पाटील, विजय भगत, प्रमोदिनी लांडगे, ऋतुजा सुर्वे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी जयंत पाटील यांनी आकडेवारीसह महायुतीच्या सरकारवर सडकून टीका केली. या सरकारच्या धोरणामुळे राज्याच्या उत्पन्नात घट झाली असून भारताच्या एकूण उत्पन्नात महाराष्ट्राचा १५ टक्के असणारा वाटा १३ टक्क्यांपर्यंत खाली आल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय २०१४ पर्यंत दरडोई उत्पन्नात कायम गुजरातच्या पुढे आणि प्रथम चार क्रमांकात असणारे आपले राज्य आता गुजरातच्या खाली असून त्याची घसरण अकराव्या क्रमांकावर आली आहे. असे श्री.पाटील यांनी सांगितले. अभिजित पाटील यांना शरद पवार साहेबांनी पूर्ण अभ्यास करून उमेदवारी दिली असल्याचे सांगून त्यांनी कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना आबांनी पाच साखर कारखाने चालवण्याचे शिवधनुष्य लीलया पेलले आहे. शिवाय त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन असून गोरगरिबांची तळमळ आहे आणि तरुण आहेत. म्हणूनच शरद पवार साहेबांच्या विचारांच्या लढाईला साथ देण्यासठी त्यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यांनी महाविकास आघाडीच्या शासनाची पंचसूत्री विषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी लक्ष्मण ढोबळे, संजय पाटील-घाटणेकर, ज्योती कुलकर्णी, संदीप साठे यांची सत्ताधाऱ्यांच्या दडपशाही राजकारणावर बोट ठेवणारी भाषणे झाली.

### निवडणूक एकतर्फी जिंकणार : अभिजित पाटील

**यावेळी उमेदवार अभिजीत पाटील यांनी माढा विधानसभा मतदार संघाच्या विजयाचे व्हिजन मांडून अभिजीत पाटलाला मत म्हणजे शरद पवार साहेबांना मत असे सांगत ही निवडणूक आपण एकतर्फी जिंकू असा विश्वास व्यक्त केला. शरद पवार म्हणजे ऊर्जा तर जयंत पाटील म्हणजे संयम असा उल्लेख त्यांनी केला तेव्हा उपस्थित हजारो नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली. माढ्याने लोकसभेला नवा खासदार दिला आता नवा आमदार देऊन येथील जनता इतिहास घडविणार असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

**प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### बस मधून उतरताना महिलेची पर्स पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) सोलापूर एसटी स्टँड येथील इचलकरंजी ते लातूर बस मधून खाली उतरत असताना फिर्यादी कोमल अनिल बडके (वय-२७,रा.कर्णिक नगर) यांच्या खांद्याला अडकवलेली पर्स अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन चोरून नेल्याची घटना ७ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. त्या पर्समध्ये ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे कानातील फुले व झुबे होते.असे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी कोमल बडके यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.ना.भीमदे हे करीत आहे.

### देव दर्शनासाठी गेल्यावर चोरट्याने घर फोडले

सोलापूर प्रतिनिधी) संपूर्ण कुटुंब हे बिदर येथील देवदर्शनाकरिता गेले असताना अज्ञात चोरट्याने घराच्या मुख्य दरवाजाचा कडी-कोंयडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील लाकडी कपाटात असणाऱ्या लॉकर मधील १ लाख ९९ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.ही घटना ४ ते ६ नोव्हेंबर दरम्यान सुनील नगर एमआयडीसी येथे घडली. याप्रकरणी चंद्रशेखर पांडुरंग गुंडला (वय-३९,रा. सुनील नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### नेव्ही मधील माजी सैनिकाच्या मेळाव्याचे १३ नोंव्हेबर रोजी आयोजन

सोलापूर : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर येथे नेव्ही मधील सेवा निवृत्त माजी सैनिकांचा मेळावा आयोजित केला असून, जिल्हयातील नेव्ही मध्ये सेवाकरुन निवृत्त झालेल्या माजी सैनिक/विधवांना तसेच त्यांच्या अवलंबितास कळविण्यात येते की, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर येथे दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता Dondale A.S. POME, आय एन एस शिवाजी लोणावळा हे आपल्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सोलापूर येथे येणार आहेत. तरी सोलापूर जिल्हयातील नेव्ही मध्ये सेवाकरुन निवृत्त झालेल्या माजी सैनिक/विधवा तसेच त्यांच्या अवलंबितांनी उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचेशी संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# आदर्श आचारसंहितेचे पालन करुन निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे : निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे

## राजकीय पक्ष उमेदवारांच्या प्रतिनिधींची बैठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणुकीची प्रक्रिया राबविली जात असून, २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात राजकीय पक्षाचे उमेदवार व अपक्षांनी आदर्श आचार संहितेचे पालन करुन, ही निवडणुक प्रक्रिया निर्भय, मुक्त आणि पारदर्शी पध्दतीने पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

२५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघातील राजकीय पक्षांच्या उमेदवारांच्या प्रतिनिधींची व अपक्ष उमेदवार, प्रतिनिधींची बैठक प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे घेण्यात आली यावेळी उमेदवार व उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी इथापे म्हणाले, दिनांक १० ते १४ नोव्हेंबर या कालावधीत बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट मशीन उमेदवारांची नावे व चिन्हांसह तयार करण्यात येतील. या प्रक्रियामध्ये उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी हजर रहावे. ईव्हीम संदर्भात कोणती शंका राहू नये यासाठी पारदर्शक पद्धतीने कामकाज केले जाईल तसेच याबाबतची माहिती पुस्तिका सर्व उमेदवारांना देण्यात आली. तसेच अशा प्रकारे तयार मशीन्स स्ट्रॉगरूमला सीसीटीव्ही कॅमेरा व सुरक्षा रक्षकांच्या निगराणीखाली सुरक्षितपणे ठेवल्या जातील. दिनांक १४ १५ व १६ नोव्हेंबरला दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वृद्धांचे घरी जाऊन मतदान घेतले जाईल. यामध्ये मतदान अधिकारी व त्यांच्यासोबत उमेदवारांचे प्रतिनिधी असतील. उमेदवारांना हा कार्यक्रम तसेच यादी आगाऊ दिली जाईल.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निवडणूक प्रक्रिया पार पडावी यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी सहकार्य करावे. उमेदवार आणि उमेदवारांच्या प्रतिनिधींनी प्रचारासाठी नियमाप्रमाणे परवानगी घ्यावी. सभा, पदयात्रा, रॅलीबाबत निर्धारित वेळ पाळावी. उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासूनच्या खर्चाचा दैनंदिन लेखा त्यांना उपलब्ध करून दिलेल्या विहित नमुन्यातील नोंदवहीमध्ये नियमितपणे लिहावा. तसेच मतदानापूर्वी तीन वेळा होणाऱ्या निवडणूक खर्च तपासणी प्रसंगी याबाबतचे रजिस्टर लेखे सादर करावेत. बॅनर, पोस्टर, पत्रके आदी प्रचार साहित्यांवर मुद्रकाचे व प्रकाशकाचे नाव प्रतींची संख्या छापावी. तसेच ज्या उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे अशा उमेदवारांनी त्याबाबत मतदानापूर्वी तीन वेळा वृत्तपत्र, वृत्तवाहिनीवर जाहिरात प्रसिद्ध करावी. मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांना चांगल्या प्रकारे प्रशिक्षण व ओळखपत्र याबाबतही सूचना यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी श्री.इथापे यांनी दिल्या.

# अंबिका देवीसमोर नारळ फोडून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपक आंबा पाटिल यांच्या प्रचाराचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ अंबिका देवी नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ मोठ्या प्रमाणात उत्साहात पार पडला.

यावेळी दीपक आबा साळुंखे पाटील बोलताना म्हणाली की गेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये शहाजी बापू पाटील यांना आम्ही आमदार केले त्यावेळीस त्यांनी आम्हाला शब्द दिला होता की पुढच्या वेळेस दीपक आबांना आमदार करूया असे शब्द दिला होता.

त्यांनी शब्द न पडल्यामुळे आम्हाला महाविकास आघाडी त जावे लागले आणि शिवसेना उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन आम्ही त्यांना उमेदवारीसाठी मागणी केली असता त्यांनी उमेदवारी दिली आणि उमेदवारी मिळाल्यानंतर आम्ही शिवसेनेच्या वतीने सांगोला मतदार संघात सर्व मतदारांना विश्वासात घेऊन पुढील कामकाज चालू केले.

यावेळी शिवसेना नेते साईनाथ अभंगराव शिवसेना सोलापूर जिल्हा अध्यक्ष संभाजी राजे शिंदे शिवसेना सर्व नेतेमंडळी व महाविकास आघाडीचे सर्व नेते मंडळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना दीपक आबा साळुंखे पाटील म्हणाले की, येत्या दहा तारखेला सांगोल्यांमध्ये शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांची सभा सांगोला येथे न्यू मुली स्कूल येथे मैदानावर दुपारी ठीक तीन वाजता होणार आहे, असे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे

# भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार समाधान आवताडे यांच्या उपस्थितीत माजी नगरसेवकाह कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार समाधान दादा अवताडे यांना पंढरपूरचे माजी नगरसेवक लखन चौगुले, धनु भाऊ धोत्रे रामा चौगुले श्रीकांत चौगुले, दीपक चौगुले यांनी भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार समाधान दादा अवताडे व भारतीय जनता पार्टीमध्ये अवताडे शिवर अँड डिक्शनरी चे चेअरमन व नामवंत उद्योजक संजय मालक अवताडे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला आहे.

# सद्गुरु बहुउद्देशीय सामाजिक संस्थेची दिवाळी अनाथ आणि बेघरांसोबत साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




सोलापूर : दिवाळी हा सण प्रकाशपर्व म्हणून देशभरात उत्साहात साजरा केला जातो. पालकांच्या प्रेमाला पोरके झालेल्या अनाथांना आपुलकीचा हात द्यावा या उद्धेशाने फराळाचे वाटप करून त्यांनाही दिवाळीच्या आनंदात सहभागी करून घेत सोलापूर येथील सदगुरु बहुउद्देशिय सामाजिक संस्थेने शनिवार दि. २ नोव्हेंबरला निलम नगर येथील शांताई अनाथ आश्रमात मुलांसोबत दिवाळी साजरी केली.

याप्रसंगी सदगुरु बहुउद्देशिय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री वंजारे - बनसोडे, संगप्पा कांबळे व राहूल उडाणशिव यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. अध्यक्षा भाग्यश्री वंजारे - बनसोडे यांच्या या उपक्रमाबद्दल उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

तसेच याप्रसंगी रस्त्यावरून फिरणारे तसेच सिव्हिल हॉस्पिटल समोरील अनाथांनाही यावेळी संस्थेच्या वतीने वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री वंजारे - बनसोडे, राजू नामन, संस्थेचे कार्याध्यक्ष तुकाराम द्यावरकोंडा आदीजण उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी गणेश मिसाळ, मल्येश जोगळेकर आदींनी परिश्रम घेतले.

# मतदारांनी आपल्या अनमोल मताचे दान द्यावे : शहाजी बापू पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सूर्य आमदार गणपतराव देशमुख यांच्या विरोधात सात निवडणुका पार पाडल्या त्यावेळी त्यांच्या विरोधात उभारण्यास कोण तयार नव्हते नसताना मी स्वतः त्यांच्या विरोधात उभारल आता मात्र निवडणूक लढवण्यास चढाओढ लागलेली आहे.

आजपर्यंत सांगोला तालुक्यातल्या निवडणुका विकासासाठी लढवल्या शेतीसाठी पाणी व पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लावला.

सांगोला तालुक्यातील युवकांना व युवतींना त्यांना रोजगार उपलब्ध भाव व त्यांच्या हाताला काम मिळावे यासाठी मोठी एमआयडीसी उपलब्ध करून देण्यासाठी व शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व उर्वरित राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी माझी उमेदवारी आहे उरलेली विकास कामे पूर्ण करण्यासाठी २० नोव्हेंबर २०२४ ची होणाऱ्या निवडणुकीमध्ये बंदोबहिनीने मोठ्या प्रमाणात धनुष्यबाणाला मत देऊन निवडून आणावे असे आवाहन शहाजी बापू पाटील यांनी ही येणारे निवडणुकी माझी शेवटची निवडणूक असेल तरी आपले अनमोल मत देऊन मला मोठ्या संख्येने निवडून द्यावे असे आवाहन शहाजी बापू पाटील यांनी केले आहे.

२५३ सांगोला मतदार संघाचे महायुतीच्या अगोदर उमेदवार शहाजी बापू पाटील मयांनी आपल्या प्रचाराचा शुभारंभ कलवडी येथे श्री सिद्धनाथ चे दर्शन घेऊन नारळ वाढवून शुभारंभ करतण्यात आला.

बलवडी गावांमध्ये शहाजीबापू पाटील यांचा भव्य सत्कार करण्यात आला सांगोला तालुक्यातील आजी माझी नेते मंडळी व महायुतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर चौपाटीचे उपसरपंच व सांगोला विधानसभेचे अध्यक्ष संजय देशमुख ग्रामपंचायत सदस्य बाबर, शिंदे, उपसरपंच रविराज शिंदे, चेअरमन दगडू बाबर, दिगंबर धायगुडे अर्जुन धायगुडे आधी जर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात विद्यार्थी दिनानिमित्त कार्यक्रम

### मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन

# विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जनासाठी परिश्रम करावेत



**विद्यार्थी दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी, डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे व मान्यवर.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर ज्ञानाची उपासना केली. त्यांचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थ्यांनी सुद्धा ज्ञान ग्रहण करण्यासाठी परिश्रम केले पाहिजेत, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व वांग्मय मंडळ आयोजित विद्यार्थी दिन कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस आर लोखंडे, समन्वयक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की डॉ आंबेडकर यांनी दुर्मिळ ग्रंथाचे वाचन केले, त्यामुळे त्यांना अतिउच्च पदव्या मिळविणे शक्य झाले. त्यांनी देशाची घटना लिहिली, त्यातून त्यांची विद्वत्ता संपूर्ण जगाने अनुभवली. आता माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रखर ज्ञानसाधना केली पाहिजे. ग्रंथालयात जाऊन ग्रंथ व संदर्भ साधनांचे वाचन केले पाहिजे. त्यातूनच विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडणार आहे असे त्यावेळी बोलताना म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. राजशेखर पवार यांनी केले तर समर्थ पवार या विद्यार्थ्याने उपस्थितांचे आभार मानले.

### विद्यार्थ्यांनी कमवा आणि शिका तत्त्व स्वीकारावे

**अध्ययन करत असताना संघर्ष करावा लागतो, सर्वांची कौटुंबिक परिस्थिती आर्थिक दृष्ट्या सारखी नसते, म्हणून विद्यार्थ्यांनी कमवा आणि शिका हे तत्व स्वीकारले पाहिजे, त्यामुळे ज्ञान घेण्याची जिज्ञासा वाढते असे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना उपदेश देताना सांगितले.**

# श्री एस एस शेळके प्रशाला वागदरी येथील १९८९ बॅचचे विद्यार्थ्यांचे ३५ वर्षांनी पुन्हा भेट, झाला स्नेह मेळावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : श्री एस एस शेळके प्रशाला वागदरी तालुका अक्कलकोट जिल्हा सोलापूर ३५ वर्षांनी पुन्हा भेट १९८९ बॅचचे विद्यार्थी स्नेह मेळावा दिनांक ३० ऑक्टोंबर २०२४ वार बुधवार रोजी वळसंग वाडा वळसंग येथे संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी श्री दिनकर जावळे माजी मुख्याध्यापक होते सर्वप्रथम कार्यक्रमचे अध्यक्ष व आजी मुख्याध्यापक अनिल देशमुख व इतर गुरुवर्य हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले सर्व वर्गमित्रातर्फे सर्व शिक्षकांचे सत्कार व शिक्षकातर्फे विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले कार्यक्रमचे अध्यक्ष व आजी मुख्याध्यापक यांनी आपल्या मनोगतातून कौतुक केले त्यानंतर जेवणाचा आस्वाद घेण्यात आला सर्व जेवणाचा खर्च श्री शांतलिंग नंदगी वागदरी यांनी दिले जेवणानंतर विद्यार्थी परिचय गप्पागोष्टी मनोरंजनाचा कार्यक्रम व फोटो सेशन अशी कार्यक्रम साजरा करण्यात आला कार्यक्रमास आलूरे सर सुतार सर कलशेट्टी सर प्रधान सर कांबळे सर पोतदार सर लंगोटी सर काटगाव सर यमाजी सर कोथिंबीर मॅडम बागवान सर रणबिरे सर स्वामी सर ढवणे सर शिक्षकेतर कर्मचारी स्वामी विज्ञान परिचर ढवणे ज्येष्ठ लिपिक, वळसंग, मुंदिनकेरी पोमाजी, बंदीछोडे. हजर होते. प्रत्येक विद्यार्थी चे आभार मानले.

## थोडक्यात...




### मतदारांनो जागे व्हा... माझे मत– माझा अधिकार... रांगोळीतून संदेश...

जगातील मोठे व भारताचे लिखित संविधान या राष्ट्रीय ग्रंथाने भारतातील सर्व स्तरातील समाजातील मानव घटकांना मतदान करण्याचा समान अधिकार दिला आहे. होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या वातावरणात कुणाच्याही आमिषाला बळी पडू नये, स्वतंत्रपणे गुप्त मतदान करावा, असा महत्त्वाचा संदेश गोदिंया श्रीनगर, चंद्रशेखर वार्डामधील कु. माही तारकेश्वर कावळे या विद्यार्थ्यांनीने स्वतः साकारलेल्या रांगोळीच्या माध्यमातून माझे मत– माझा अधिकार दिला आहे. मतदारांनी जागृत राहून लोकशाही बळकट करण्यासाठी आपला हक्क अधिकाराधीन बजवावा असे चित्र रांगोळीतून व्यक्त होताना दिसते, ही रांगोळी वाटसरुंचे लक्ष वेधून घेत आहे हे तितकेच खरे ठरते.

**छायाचित्र– मुन्नाभाई नंदागवळी गोदिंया**

# मंदिर, मंदिर परिसर व दर्शन रांगेत १२० सीसीटीव्ही कॅमेरे

## यात्रा कालावधीत विविध घटनांच्या घडामोडीवर सीसीटीव्हीची नजर : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिसर, श्री संत तुकाराम भवन, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, संपूर्ण दर्शन रांग, पत्रा शेड आदी ठिकाणांतील घटना , घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने कायम स्वरुपी व तात्पुरत्या स्वरूपात असे एकूण १२० ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

कार्तिकी वारीच्या निमित्ताने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे, या सर्व भाविकांचे सुलभ व जलद गतीने दर्शन व्हावे, यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत. दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये, भाविकास काही शारीरिक त्रास झाल्यास तात्काळ आरोग्य व्यवस्था उपलब्ध करून देणे, कोणत्याही स्वरूपाचा अनुचित प्रकार घडू नये व इतर अनुषंगिक घडामोडींवर सीसीटीव्हीची नजर असणार आहे. मंदिर, मंदिर परिसर, दर्शन रांग व इतर ठिकाणी काही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास किंवा काही सूचना द्यावयाच्या असल्यास नियंत्रण कक्षातून वॉकीटॉकीद्वारे संवाद साधून तात्काळ आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सीसीटीव्हीची खूप मोठी मदत होत आहे. याशिवाय, कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापक यांच्या कार्यालयात देखील या कॅमेऱ्यांचा अक्सेस दिला असल्याने त्यांना मुख्यालयात बसून सर्व घडामोडी पाहता येत आहेत.

भाविकांना केंद्रबिंदू मानून भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ज्या ज्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज होती, त्या त्या ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये आयपी, अनॉलॉग व मेगापिक्सल नाईट व्हिजनचे अत्याधुनिक कॅमेरे आहेत. या सर्व कॅमेराद्वारे चित्रित केलेला डाटा देखील सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था निर्माण केलेली आहे. संबधित कॅमेरे सर्व दिशेस कव्हर करीत असल्याने कोणताही परिसर त्याच्या नजरेतून सुटत नाही. त्यामुळे भाविकांमध्ये सुरक्षितता निर्माण होणार असून, आवश्यक ठिकाणी भाविकांना तात्काळ मदत देखील करता येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

**संबधित ठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे परीक्षण करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आणि श्री संत तुकाराम भवन येथे असे दोन नियंत्रण कक्ष (कंट्रोल रुम) तयार करण्यात आले आहेत. या नियंत्रण कक्षामध्ये २४ तास सीसीटीव्ही ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली असून, या यंत्रणेची श्र जबाबदारी अनुभवी संगणक तज्ञ तथा विभाग प्रमुख राजेंद्र घागरे यांना देण्यात आली आहे. याशिवाय, पोलीस प्रशासनाकडून देखील कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आलेली असून सीसीटीव्हीरुपी तिसऱ्या डोळ्याचा वॉच परिसरावर राहणार आहे.**

# चंद्रभागेच्या तीरावर महिला भाविकांसाठी १० चेंजिंग रूम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल–रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येणा–या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. येणाऱ्या भाविकांना मंदिर समितीकडून मुबलक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत, तसेच विठूरायाचे दर्शन घेण्यापूर्वी अनेक भाविक चंद्रभागेमध्ये स्नान करतात. महिला भाविकांसाठी चंद्रभागा वाळवंटात स्नान केल्यानंतर कपडे बदलण्यासाठी १० चेंजिंग रूमची उभारणी करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

दिनांक १२ नोव्हेंबरला कार्तिकी एकादशीचा मुख्य सोहळा संपन्न होत आहे. त्याआधी वारकरी आणि भाविक श्री क्षेत्र पंढरपुरात दाखल होत आहेत. वारीला येणारे बहुतेक सर्व भाविक विठूरायाच्या दर्शनापूर्वी चंद्रभागा नदीमध्ये स्नान करीत असतात. सदर ठिकाणी महिला भाविकांना कपडे बदलण्याची सोय करण्याच्या दृष्टीने चंद्रभागा नदीपात्रात १० ठिकाणी चेंजिंग रूम बसविण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, महिलांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने चेंजिंग रूमजवळ २४ तास महिला सुरक्षा कर्मचा–याची नेमणूक करण्यात आली आहे. मंदिर प्रशासनाकडून उभारण्यात आलेल्या चेंजिंग रूमद्वारे एकावेळेस ३० ते ४० महिला भाविक कपडे बदलू शकतात.

**दर्शनरांगेत ४ ठिकाणी हिरकणी कक्षाची उभारणी**

कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, पत्राशेड व श्री विठ्ठल सभामंडप येथे ४ ठिकाणी हिरकणी कक्षाची (स्तनपान गृह) उभारणी करण्यात आली आहे. याशिवाय, दर्शनमंडप येथे सॅनिटरी नॅपकीनची देखील उपलब्धता करण्यात आली असून श्रींच्या दर्शनरांगेत महिला भाविकांच्या सुरक्षततेच्या दृष्टीने पोलीस कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त मंदिर समिती मार्फत महिला स्वयंसेवक नियुक्त करण्यात आलेले आहेत. या यात्रेला येणा–या सर्व वारकरी भाविकांची सेवा करण्यास मंदिर प्रशासन सदैव तत्पर असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.




# मुंबईत महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून येणाऱ्या अनुयायांच्या सोयी सुविधेसाठी पूर्व तयारी बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विजय घनघाव

मुंबई/प्रतिनिधी : बृहन्मुंबई महानगरपालिका जी / उत्तर विभाग येथे माननीय प्रशांत सपकाळे उपायुक्त परिमंडळ २ यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून येणाऱ्या अनुयायांची सोयी सुविधा करण्यासाठी पूर्व तयारीची बैठकीचे सभागृहात आयोजित केली होती.

त्या वेळी जी / उत्तर विभाग चे सहाय्यक आयुक्त मान. अजितकुमार आंबी साहेब, जनसंपर्क अधिकारी मान. तानाजी कांबळे साहेब, सब इंजि. संदीप कदम साहेब, पोलीस निरीक्षक मान. संध्या खाडे मॅडम, अग्निशमन दलाचे अधिकारी मान.पाटील साहेब, जे.इं.माळी साहेब. सहाय्यक जनसंपर्क अधिकारी धीरज सूर्वे साहेब, सहाय्यक अभियंता गावडे साहेब, सहाय्यक अभियंता भोईर साहेब. आदी मान्यवरांचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश विद्यार्थी दिन निमित्त प्रतीक कांबळे यांच्या विश्वशांती सामाजिक संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

त्याच बरोबर भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मान.भिकाजी कांबळे साहेब, बौद्धजन पंचायत समितीचे माजी कार्याध्यक्ष व पतपेढीचे अध्यक्ष किशोर मोरे साहेब, देवदासी व दुर्लक्षित घटक समाजाचे ज्येष्ठ नेते विलास रुपवते साहेब, आंबेडकरी समाजाचे नेते नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेन्द्र साळवे साहेब, विद्यार्थी सेनेचे आशिष गाडे, ज्येष्ठ नेते चिंतामण खरे (बाबा), बबन चंदनशिवे, राकेश सरवदे भारतीय बौद्ध महासभेच्या महिला कमिटीच्या प्रमुख पदाधिकारी तसेच विविध संघटनेचे अनेक मान्यवर उपस्थित होते. सदर बैठकीत अत्यंत महत्त्वाचे नवीन नवीन विषय देखील पुढे आले या सगळ्यांवरती लवकरच योग्य तो निर्णय होणार असून येत्या ६ डिसेंबर रोजी अनुयायांच्या सर्व सोयी सुविधांमध्ये कोणतीही गैरसोय होणार नाही याबाबत माननीय उपायुक्त यांनी सर्व उपस्थित त्यांना आश्वासित केले केले.

कामगार नेते रमेश मारुती जाधव अध्यक्ष जनसंपर्क व प्रसिद्धी समिती बौद्धजन पंचायत समिती

# संपादक रुपेश पाडमुख यांना मुंबईचा आचार्य अत्रे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लोहा/प्रतिनिधी : नांदेड येथिल दैनिक समीक्षा चे संपादक मागील पंचवीस वर्षापेक्षा अधिक काळ वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत राहून पुरस्कार सोहळ्यासह विविध उपक्रम राबवणारे दै. समीक्षाचे संपादक रुपेश पाडमुख यांना मुंबई येथील आचार्य अत्रे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला असून दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी मुंबई मराठी ग्रंथ संग्रालय सुरेंद्र गावस्कर सभागृह, नायगाव, दादर (पूर्व) येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान सोहळा संपन्न होणार आहे.काळापासून विविध वर्तमानपत्रात सेवा देत सतरा वर्षांपासून दै. समीक्षा वृत्तपत्र काढून अन्यायाविरुद्ध वाचा फोडत वंचितचा लढा देण्यासाठी पुढाकार घेण्याचे कार्य संपादक रुपेश पाडमुख हे सातत्याने करत आहेत. एवढ्यावरच न थांबता वृत्तपत्र क्षेत्रातील वृत्तपत्र विक्रेत्यांसह वेगवेगळ्या क्षेत्रात सेवा देणाऱ्यांना पुरस्कार देण्यासह शहिद जवानांच्या कुटुंबीयांचा सन्मान, पोलीस दलातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान आणि विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवणाऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम सतरा वर्षांपासून राबविण्यात येतो.वृत्तपत्र क्षेत्रासहीत सामाजिक सेवेची दखल घेऊन मुंबई येथील पत्रकार संघ व सा. भगवे वादळ यांनी आचार्य अत्रे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर केला आहे. मुंबईचा पुरस्कार पाडमुख यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांना सर्व क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# भाजपा तालुका उपाध्यक्ष पदी किशोर सुरवसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनीधी : भारतीय जनता पार्टी तुळजापूर तालुका उपाध्यक्ष पदी वागदरी ता.तुळजापूर येथील निष्ठावंत कार्यकर्ते किशोर लक्ष्मण सुरवसे यांची निवड करण्यात आली आहे. किशोर सुरवसे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत.गावात आयोजित आरोग्य शिबीर, महापुरुषांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम, शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यक्रम, अशा प्रकारे विविध समाजोपयोगी सामाजिक उपक्रमात त्यांचा सहभाग असतो.भाजपाचे ते एक निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा तालुकाध्यक्ष संतोष बोबडे यांनी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते सिध्दु आण्णा कोरे, विलास राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना सदर निवडीचे पत्र दिले आहे. त्यांच्या या सार्थ निवडी बद्दल भाजपाचे वागदरी बुथ प्रमुख मदन पाटील, भाजपा मेडीया सेलचे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ, भाजपाचे नेताजी माडजे,विश्वनाथ पाटील, तानाजी वचने, शंकर धुमाळ, बाळु पवार, रामसिंग परिहार,सह कार्यकर्ते मित्र परिवारानी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**जेष्ठ महिलांसह समाजातील प्रमुख व्यक्तीचा होणार भव्य सन्मान**

**नळदुर्ग या ऐतिहासिक नगरीत प्रथमच सर्व धर्म समभाव कार्यक्रम होतोय संपन्न**

# नळदुर्ग येथे राजगुरू श्री शिवलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजी पुण्यस्मरणोत्सवानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





नळदुर्ग/प्रतिनिधी, दादासाहेब बनसोडे : सुक्षेत्र नळदुर्ग येथे राजगुरू श्री शिवलिंगेश्वर हिरेमठ निर्वीकल्प समाधीस्त राजगुरू श्री ष ब्र १०८ शिवलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजी पुण्यस्मरणोत्सव निमित्त नळदुर्ग शहरांमध्ये प्रथमच जगद्गुरु रेणुकाचार्य पंचधातू मूर्ती प्रतिष्ठापना व गुरुमाता अमृत महोत्सव निमित्त तुलाभार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम दिनांक ७ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर पर्यंत विविध कार्यक्रमांनी आयोजित करण्यात आलेला आहे

नळदुर्ग येथील श्री शिवलिंगेश्वर हिरेमठाला हजारो वर्षाचा जाज्वल्य इतिहास आहे १२ व्या शतकात बसवकल्याणचे प्रवेशददार म्हणून या मठात अनेक शरणाने वास्तव्य केले आहे त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे जागरत मठ म्हणून ओळखले जाते याच मठात सर्व धर्म समभाव म्हणत विरशैव समाजाने नळदुर्ग शहरात ७५ वर्षाच्या पुढील महिलांचा सन्मान करण्याचे योजले आहे तर सर्व जाती धर्माच्या नागरीका म्हणते प्रत्येक समाजातील ५ प्रमुख व्यक्तीचा सन्मान करण्यात येणार आहे एवढा मोठा कार्यक्रम आयोजित करणे हे प्रबोधनात्मक धोरण आहे हा नळदुर्ग शहरातला सर्वात मोठा कार्यक्रम मानला जातोय या कार्यक्रमाच्या वेळी प्रवचना साठी श्री ष ब्र शांतीवीर शिवाचार्य महास्वामीजी हावगी, लिंगेश्वर मठ गडी गौडगाव , श्री शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी कट्टी मठ जळकोट श्री श्री श्री जय मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी नारळ मठ मुरूम , श्री पूज्य प्रभू देवराव खेडगी, श्री प पु शिव बसव देवरू मुंढेवाडी श्री प पू निरुपादी देवरू गंगरू , श्री म नी प्र विरंतेश्वर महास्वामीजी विरक्त मठ केसर जवळगा श्री म नी प्र बसवलिंग महास्वामी जी विरक्त मठ अक्कलकोट, श्री म नी प्र सदाशिव महास्वामीजी, श्री रुद्रमनेश्वर मठ चिकलपर्वी, सानिध्य श्री मातोश्री जगदेवी ताई भद्रेश्वर मठ शिरवळ, श्री म नी प्र अभिनव शिवलिंग महास्वामीजी विरक्त भट मादन हिप्परगा, सानिध्य श्री श्रीकांत शिवाचार्य महास्वामीजी हेरमेट नागणसूर, प्र ब श्री म नि प्र नीलकंठ शिवाचार्य महास्वामीजी महेंद्रजी, श्री मनी केंद्र महास्वामीजी रक्त भट्ट ममदापूर श्री प व बालयोगी महेश्वरानंद महाराज शिंदगाव श्री पूज्य प महास्वामीजी गंगाधर स्वामी मठ तोळनूर , श्री अध्यात्मिक प्रवचन मंगल श्री ष प्र बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त अक्कण बळग आणि महिला मंडळा तर्फे तुलाभार कार्यक्रम संपन्न होणार असून त्यामध्ये दिव्य सानिध्य श्री म नी प्र राजशेखर महास्वामीजी विरक्त मठ नंदगाव, श्री म नी प्र शिवबसव राजेंद्र महास्वामीजी विरक्त मठ खेडगी, प्रवचन मंगल वाक्य श्री ष ब्र शांतिवीर शिवाचार्य महाराज महास्वामीजी पंचगृह हिरेमठ अम्मीनभावी श्री म श्रा गंगाधर महास्वामीजी विरक्त मठ धरणे जेवळी

श्री ष ब्र केदारलिंग शिवाचार्य महास्वामी हिरेमठ हेडगापूर दिनांक ०७ ते १८ तारखेला श्री श्री श्री वीर सोमेश्वर शिवाचार्य महाभगवत्पाद रंभापुरी महास्वामीजीधर्म संदेश सभा संपन्न होणार आहे श्री चक्र बसवराज शिवाचार्य महास्वामीजी आणि विद्वत्त पूर्ण गोजीर वाणीने आपल्या भक्तांना मठाच्या लौकिकात भर टाकली आहे नळदुर्ग येथे ५५ वर्षानंतर जगद्गुरु स्वामी वीर सोमेश्वर शिवाचार्य भगवत जगद्गुरु चे आगमन होत असून सदरील या महास्वामीच्या पदस्पर्शाने नळदुर्ग नगरी पुन्हा एकदा पवित्र होणार आहे त्यांच्या धर्मसभेत धर्मजागृती देव , देश, धर्म, अशा त्रिवेणी सन्मानाचा उद्देश होणार आहे.

यावेळी आद्य पालखी महोत्सव शस्त्र कुंभ व भव्य दिव्य वाद्य वैभव समय शहरांमध्ये संपन्न होणार आहे त्यांची धर्म संदेश सभा संपन्न होणार आहे सदरील कार्यक्रमासाठी नळदुर्ग नगरी आणि परिसरातील नागरिकाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान मठाधिपदी श्री शब्र बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले आहे नळदुर्ग शहरात प्रथमच सर्वधर्म हा कार्यक्रम होत आसल्यामुळे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.